पुढारी

# तळोजा शहरात आलिशान प्रकल्प

नवी मुंबई : लव्ह होम्स आणि अनंत बिल्डर्स यांच्या वतीने रिव्हरसाईड तळोजा प्रकल्प लॉन्च करण्यात आल्याने मुंबई तसेच नवी मुंबईतील रहिवाशांना अतिशय परवडणाऱ्या दरांत उंची जीवनशैलीचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या प्रकल्पाला अभिनव पद्धतीने वसलेल्या चांगल्या परिसरासोबतच दळणवळणाची व्यवस्थित सोय होणार असून सोबतच नदी आणि गर्द वनराईने नटलेल्या शांत निसर्गाचा लाभ मिळेल. या प्रकल्पातंर्गत १ बीएचके आणि २ बीएचके रू. ३३.५० लाख, सर्वसमावेशक अशा किंमतीत देऊ करण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे सल्लागार भारत धुप्पार म्हणाले, आमचा नवीन रियल इस्टेट प्रकल्प, रिव्हरसाईड तळोजा लॉन्चची घोषणा करताना आम्हाला उत्साह वाटतो आहे. या प्रकल्पात रहिवाशांना आनंद घेता येईल, अशा विविध आलिशान सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. या प्रकल्पांत तरणतलाव (स्विमिंग पूल), व्यायामशाळा (जिम), क्रिकेट मैदानाचे बॉक्स, फुलपाखरू उद्यान आणि विविध प्रकारच्या इतर सुविधांचा समावेश आहे. त्याशिवाय, रिव्हरसाईड वॉकसह रहिवाशांना नदीच्या विहंगम परिसराची मजा लुटता येईल. निसर्गाच्या सानिध्यात सर्वोच्च राहणीमानाचा अनुभव घेण्याच्या दृष्टीने हे एक सर्वोत्तम ठिकाण मानले जाते.

My Palghar Edition
Jan 18, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in